म. ग्रं.

| विषय | पुस्तकाचें नांव |
| --- | --- |
| निबंध | लेखक ईश्वरस्मरणापू... |
| | स्वपरसंतोषजनक लोक... |
| संग्रहालय क्रमांक | लेखक |
| ५१ | पुस्तकाचें नांव राजारामशा... |
| १८० | |

५१

सं. क्र.

ईश्वरस्मरणपूर्वक स्वसंतो... जनक लोकवर्तन.

निबंध

म. ग्रं. सं. ठाणें
वि
सं.

# ...दु यूनियन् क्लब्

नामक मंडळीच्या आश्रयाखालीं आरंभिलेली

हेमंतव्याख्यानमाला, वर्ष तिसरें.

१८८८
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. ५८०

व्याख्यान पांचवें.

विषय,

## ईश्वरस्मरणपूर्वक स्वपरसंतोषजनक लोकवर्तन.

व्याख्यानकार,

महामहोपाध्याय वे. शा. सं. राजाराम शास्त्री बोडस.

मुंबईंत

"निर्णयसागर" छापखान्याचे मालक यांनीं छापिलें.

१८८८.

किंमत १॥ आणा.

# उपोद्घात.

गेल्या शनिवारीं व्याख्यान झालें, त्यामध्यें ऑनरेबल् राजमान्यराजश्रीविरा-
त रावसाहेब नारायण विष्णु बापट; यांनीं संस्कृत विद्येला उत्तेजन येण्या-
र्थीं प्राचीनकाळचे विक्रमादित्यासारखे सार्वभौम राजे, व कालिदासासारखे सार्वभौम पंडित झाले. त्यांच्या उत्पत्तिकालाची व स्थितिकालाची माहिती बहुत परिश्रम करून बहुत पुस्तकें वाचून दिली, ती ज्यांना ठाऊक नव्हती त्यांना समजली; हा मोठा उपकार झाला. परंतु त्यांचें तात्पर्य कालाची माहिती व त्यांचीं नांवें मात्र श्रोत्यांनीं समजावीं, इतकेंच नाहीं; तर जसें त्या लोकांनीं ईश्वराचें आराधन, विद्याभ्यास व लोकव्यवहार हीं उत्तम करून त्यांनीं पुरुषार्थ संपादन केले; तसे आतांही उमेदवारांनीं करावे हें तात्पर्य आहे. कारण, विष्णुसहस्रनामस्मरणासारखा केवळ त्यांच्या नामस्मरणांनीं कांहीं पुरुषार्थ सिद्ध होईल असें वाटत नाहीं. असें असतां मतभेदानें एखाद्या कोणच्या स्थितीच्या कालाचा व्यत्ययही त्यांच्या सांगण्यांत आला असला तरी, श्रोत्यांनीं तिकडे दृष्टि न देतां तात्पर्याकडे दृष्टि दिली पाहिजे; ह्मणून ते प्राचीन लोक ईश्वरसेवा, विद्याभ्यास व लोकवर्तन ...र कसें करीत होते, हें त्यांच्या ग्रंथावरून व अनुमान, व ऐतिह्य प्रमाणावरून जें कांहीं मी समजलों आहें तें संस्कृत विद्येच्या वृद्धीकरितां यथामति निरूपण करितों.

सं. नि. २६

मराठी ग्रंथ संग्रहालय नं. ४५३ ठाणें सन १८९

# ईश्वरस्मरणपूर्वक स्वपरसंतोषजनक लोकवर्तन.

रमेश्वराच्या अनुग्रहेंकरून सांप्रतकालीं जगत्कर्ता ईश्वर मुळींच नाहीं स्वभाव नेंच सर्व जगताचे परिणाम होतात असें मानणारे लोक या भरतवर्षांत फार निघतील व त्यांच्या भाषणाचें वजनही कोणी मानणार नाहींत. ही एक मोठी यानकारक गोष्ट आहे. यावर शंका बहुत येतात. त्या अशा कीं जग- त्व हें ईश्वराला सर्वज्ञत्व व सर्वशक्तिमत्व असल्यावांचून संभवणार नाहीं. ा, साधारण एकाद्या राजाला किंवा शिल्प्याला अथवा विद्वानाला आपले तील लोकांची सुव्यवस्था व घरें, किल्ले वगैरे बांधणें आणि सर्वविद्वन्मनोरं- ग्रंथ व अध्यापन हीं करण्यास किती वर्षे श्रम करावे लागतात तरी हीं कार्यें जोगतीं सिद्ध होत नाहींत, बहुत दोष त्यांत निघतात. मग सर्व जगताच्या रच- कर्ता जो परमेश्वर त्याला सर्वज्ञत्वादिक धर्म अवश्य असलेच पाहिजेत ते नेले तर सर्व शक्तिमान् जर ईश्वर आहे तर त्यानेंच केलेले जे सर्व प्राणी स दुःख अणुमात्रही न व्हावें पण बहुत प्राणि दुःखि असे; दिसतात. ी फार थोडे दिसतात. हें करणें ईश्वराला युक्त नाहीं. कारण तो सर्वांचा ा पितरूप आहे. जसें पुत्राला सुख होण्याकरितां मातापिता यत्न करितात ईश्वरानें सर्व प्राण्यांस अनायासेंकरून सुख दिलें पाहिजे. दुःख कधींही नये; परंतु तसें दिसत नाहीं. ह्मणून ईश्वर मानणें व्यर्थ आहे. या शंकेचें स- धान जे कोणी ईश्वर जगत्कर्ता आहे, असें मानितात; परंतु मनुष्यांस पूर्वा- र हीं कांहीं नाहींत, कसेंही यथेच्छ आचरण केलें तरी किंचित् ईश्वराचें स्मरण केल्यानें देह सुटला ह्मणजे तत्काळ मोक्ष होतो असा निश्चय करितात. लोक व ब्रह्मादिक देव हे आहेत किंवा नाहींत याविषयीं संशयांतच राहतात पशुपक्ष्यादिक प्राणि हे फलपुष्पादिकासारिखे भोग्य समजतात. त्यांच्यानें शंकेचें समाधान कधींही होणार नाहीं. अंततः निरीश्वरवाद व जगदुत्प- दिक हें स्वाभाविक आहे, असें ह्मणावें लागेल, असें ह्मणतील तर, त्यांचें ईश्वर नणें व्यर्थ होईल. तें व्यर्थ जाहल्यानें त्यांनीं ईश्वर आहे, आसा जो अंगिकार ला आहे, त्याचा त्याग केला जाईल. तो त्याग त्यांनीं केलाअसतां त्यांच्या समोर चची गरीबांची भाषण करण्याची कांहींच योग्यता राहाणार नाहीं. यास्तव जे द्वान् लोक स्वर्ग व सर्वप्राण्यांस पूर्वापर जन्में असतात असें 'क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं शंति' इत्यादिक शास्त्रांवरून मानितात व एक मनुष्य राजकुलांत उत्पन्न होतो आणि क महादरिद्री होतो, हें जन्मांतरच्या पुण्यपापावांचून होणें नाहीं. जसें कारण

सं.नि. २६

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. ५५३
ठाणें सन १८९

# ईश्वरस्मरणपूर्वक स्वपरसंतोषजनक लोकवर्तन.

रमेश्वराच्या अनुग्रहेंकरून सांप्रतकालीं जगत्कर्ता ईश्वर मुळींच नाहीं स्वभाव नेंच सर्व जगताचे परिणाम होतात असें मानणारे लोक या भरतवर्षांत फार निघतील व त्यांच्या भाषणाचें वजनही कोणी मानणार नाहींत. ही एक मोठी यानकारक गोष्ट आहे. यावर शंका बहुत येतात. त्या अशा कीं जग- त्व हें ईश्वराला सर्वज्ञत्व व सर्वशक्तिमत्व असल्यावांचून संभवणार नाहीं. , साधारण एकाद्या राजाला किंवा शिल्प्याला अथवा विद्वानाला आपले तील लोकांची सुव्यवस्था व घरें, किल्ले वगैरे बांधणें आणि सर्वविद्वन्मनोरं- ग्रंथ व अध्यापन हीं करण्यास किती वर्षें श्रम करावे लागतात तरी हीं कार्यें जोगतीं सिद्ध होत नाहींत, बहुत दोष त्यांत निघतात. मग सर्व जगताच्या रच- कर्ता जो परमेश्वर त्याला सर्वज्ञत्वादिक धर्म अवश्य असलेच पाहिजेत ते नेले तर सर्व शक्तिमान् जर ईश्वर आहे तर त्यानेंच केलेले जे सर्व प्राणी स दुःख अणुमात्रही न व्हावें पण बहुत प्राणि दुःखि असे; दिसतात. ी फार थोडे दिसतात. हें करणें ईश्वराला युक्त नाहीं. कारण तो सर्वांचा ा पितृरूप आहे. जसें पुत्राला सुख होण्याकरितां मातापिता यत्न करितात ईश्वरानें सर्व प्राण्यांस अनायासेंकरून सुख दिलें पाहिजे. दुःख कधींही नये; परंतु तसें दिसत नाहीं. ह्मणून ईश्वर मानणें व्यर्थ आहे. या शंकेचें स- ान जे कोणी ईश्वर जगत्कर्ता आहे, असें मानितात; परंतु मनुष्यांस पूर्वा- हीं कांहीं नाहींत, कसेंही यथेच्छ आचरण केलें तरी किंचित् ईश्वराचें स्मरण केल्यानें देह सुटला ह्मणजे तत्काळ मोक्ष होतो असा निश्चय करितात. र्गलोक व ब्रह्मादिक देव हे आहेत किंवा नाहींत याविषयीं संशयांतच राहतात पशुपक्ष्यादिक प्राणि हे फलपुष्पादिकासारिखे भोग्य समजतात. त्यांच्यानें शंकेचें समाधान कधींही होणार नाहीं. अंततः निरीश्वरवाद व जगदुत्प- ादिक हें स्वाभाविक आहे, असें ह्मणावें लागेल, असें ह्मणतील तर, त्यांचें ईश्वर नणें व्यर्थ होईल. तें व्यर्थ जाहल्यानें त्यांनीं ईश्वर आहे, आसा जो अंगिकार ा आहे, त्याचा त्याग केला जाईल. तो त्याग त्यांनीं केलाअसतां त्यांच्या समोर ची गरीबांचो भाषण करण्याची कांहींच योग्यता राहाणार नाहीं. यास्तव जे द्वान् लोक स्वर्ग व सर्वप्राण्यांस पूर्वापर जन्में असतात असें 'क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं शंति' इत्यादिक शास्त्रांवरून मानितात व एक मनुष्य राजकुलांत उत्पन्न होतो आणि क महादरिद्री होतो, हें जन्मांतरच्या पुण्यपापावांचून होणें नाहीं. जसें कारण

तसें कार्य होतें इत्यादिक अनुमानावरून निश्चित करितात. त्यांच्या समक्ष यथामति ईश्वरस्वरूप मानून त्याचें स्मरणपूर्वक लोकवर्तन कसें करावें ह्याविषयीं भाषण करण्याची इच्छा करितों. कारण त्या भाषणांत मंगलार्थ कांहीं ईश्वराचें नामस्मरण जाहालें पाहिजे व जरी सांप्रतकालांत व्यवहाराला प्राधान्य आहे, तरि तो व्यवहार ज्या मनुष्याचें इमान खरें असतें त्याचाच निर्विघ्न सिद्धीला प्राप्त होतो, असें दृष्ट आहे. इमान हा शब्द हिंदुस्थानी भाषेंत इतर भाषेपासून आलेला आहे. तो प्रसिद्ध आहे, त्याचा अर्थ विद्वान् लोक असा समजतात कीं, मी जर कोणाशीं असत्य व दुःखप्रद असा व्यवहार केला तर मला ईश्वरापासून महादंड होईल. असें मानणें यावरून व्यवहारांतही ईश्वर मानण्याची अत्यंत जरूर आहे, हें सिद्ध होतें, नाहींतर सर्वलोक उच्छृंखल होऊन मोठामत्स्य लहान मत्स्याला खातो याप्रमाणें सर्व व्यवहाराचा उच्छेद करतोल. ह्मणून इमानाच्या रक्षणाकरितां व भक्तीकरितां ईश्वराचें स्वरूप शास्त्रकारांनीं सांगितलें व अनुमानानें सिद्ध केलें त्याचें यथामति प्रथम निरूपण करितों. ईश्वर शब्द हा ‘ईश ऐश्वर्यें’ या धातूपासून ‘स्थेशभासपिसकसोवरच्’ या पाणिनिसूत्रानें वरच्प्रत्यय होऊन झाला आहे. त्यांत ऐश्वर्य म्हणजे सर्वशक्तियुक्तत्व हें आहे. त्या सर्व शक्ति जगताची उत्पत्ति पालन व संहार यांचें कर्तृत्वरूप आहे, जाला तो ईश्वर जाणावा भूम्यादिकांचे राजे यांच्या ठायीं ईश्वराचें कांहीं साधर्म्य असल्याकारणानें त्यांसही ईश्वरशब्द लावतात; परंतु तो गौणच जाणावा. कारण मुख्य ईश्वराइतक्या शक्ति कोणांतही इतर देवमनुष्यादिकांत नाहींत हें स्पष्ट आहे. आणि अविद्या, अहंकार, राग द्वेष व मरणभय हे पांच क्लेश तज्जन्य कर्में त्यांचीं जन्म, आयुष्य व भोग हीं फलें व त्यांच्या पुढच्या जन्मास कारण होणाऱ्या संस्काररूपी वासना ह्या इतर सर्वांस आहेत. ईश्वराला नाहींत, ह्मणून त्याला परमात्मा ह्मणतात. यांत आत्मशब्द हा ‘अतसातत्यगमने’ या धातूहून मनिन्प्रत्यय केल्यानें निष्पन्न जाहाला आहे. त्यावरून सतत गमन म्हणजे नित्य ज्ञान हें ईश्वराचें स्वरूप सिद्ध होतें. आतां जीवांसही आत्मा असें ह्मणतात, तर त्यांस सतत ह्मणजे अविच्छेदेंकरून क्षणिक ज्ञानें होतात. गाढनिद्रेंतही अतिसूक्ष्म ज्ञानें होतात. हे प्रमाणांनीं सिद्ध केलें आहे. म्हणून त्यांस आत्मा असें ह्मणतात, परंतु परमात्मा असें ईश्वरालाच ह्मणतात, कारण त्याचें सतत ज्ञानस्वरूप अखंड एक रसरूप आहे. जर असें आहे तर थोडे प्राणी सुखी व बहुत प्राणी दुःखी असें जगतामध्यें वैचित्र्य कां होतें? तर याचें उत्तर असें कीं, शास्त्रदृष्टीनें पाहिलें तर थोडे प्राणी सुखी ही शंका ईश्वर न मानणारे लोकांच्या संगतीनें ईश्वर मानणाऱ्या लोकांसही होत्ये. परंतु ती भ्रांति आहे. कारण ज्यांनीं बहुत साधुसमागम व बहुत शास्त्रपरिशीलन केलें आहे. त्यांची ही भ्रांति लवकर दूर होत्ये. ती अशी, शास्त्ररीतीनें सर्व ब्रह्मांडाची रचना मनांत आणिली तर त्यांत मृत्यु-



लोक हा फार लहान आहे. त्यांत प्राणीही स्वर्गलोकादिगत देवादिकांच्या पेक्षां बहुत थोडे आहेत. त्यांत जे ईश्वरोपदिष्ट सत्कर्में करीत नाहींत. असत्यानें वागतात. व दुसरा गरीब निरपराध असला तरी कपट करून त्याला उपद्रव देतात. त्यांस मात्र दुःख प्राप्ति होत्ये, तिचें निवारण ईश्वर करूं शकत नाहीं. कारण तो दुःखभोग पुनः दुःखप्राप्ति न होण्याकरितां वैराग्याचा संपादक आहे. जसा शिष्याला गुरु विद्याप्राप्तिकरितां शिक्षा करितो ती शिक्षा जो भोगतो तो विद्वान होतो. जो त्या शिक्षेला त्रासतो. तो मूर्ख व दुःखी होतो ह्मणून गुरुशिक्षा उपकारक आहे अपकारक नाहीं, याविषयीं पातंजल भाष्यांतोल—साम्रृतैः पाणिभिर्घ्नंति गुरवो न विषोक्षितैः। लालनाश्रयिणो दोषास्ताडनाश्रयिणो गुणाः ॥ असा श्लोक प्रसिद्ध आहे. जे प्राणी येथें ईश्वरोपदिष्ट मार्गाला अनुसरून सत्यानें वागतात. व सर्वदां परोपकार करितात त्यांस देवत्वादि प्राप्ति होऊन. चिरकाळपर्यंत. ते सुखच भोगतात. जसें, जे शिष्य, विद्या ग्रहणकालीं श्रम करितात, त्यांस सुखकर विद्या प्राप्त होत्ये. जे त्या श्रमाला भिऊन पळतात, ते दासत्वादिप्रयुक्त दुःख यावत्जीव भोगतात. याविषयीं एक लौकिक आभाणक श्लोक आहे. तो असा—अर्धांगुलपरीणाहजिव्हाग्रायासभीरवः ॥ सर्वांगीणपरिक्लेशमबुधाः कर्मकुर्वते ॥ १ ॥ तेव्हां इतकी दुःखरूपी शिक्षा जगांत असलीच पाहिजे. उन्हांत गेल्यावांचून छायेचें सुख कळत नाहीं. कोणी ह्मणेल कीं, सर्व शक्ती त्याला आहेत, तर दुःख हा पदार्थ त्यानें उत्पन्न करूं नये. असत्कर्में दुःख उत्पन्न करतात. ईश्वर करीत नाहीं. असें ह्मटलें तरी सर्वनियंता तो आहे. त्यानें असत्कर्म करण्याची बुद्धि देऊं नये. तर याचें उत्तर असें कीं, तो सर्व शक्तिमान् असला तरी. ज्या शक्ति प्रसिद्ध आहेत. त्या सर्व त्याजवळ आहेत. मनुष्यांस शृंगपुच्छें असतीं तर बरें होतें. अलंकार, तुरे वगैरे घालावयास शृंगें उपयोगीं पडतीं. पुच्छें माशा वगैरे हाकावयास उपयोगीं पडतीं. परंतु तीं उत्पन्न करण्याची शक्ति अप्रसिद्ध असल्यामुळें ईश्वराजवळ नाहीं. त्याला काय करावें. ती नसली तरी. त्याच्या ईश्वरत्वाची हानि कांहीं होत नाहीं. असत्कर्माची बुद्धि तो देतो. हीहि शंका व्यर्थ आहे. कारण. सत्कर्मांचे शास्त्ररूपी उपदेश त्याणें केले नसते. तर ही शंका येती. ते केले असूनही. त्यांचा अनादर करून असत्संगतीनें. असत्कर्में करितात. हा मनुष्यांचाच अपराध आहे. ईश्वरावर कांहीं दोष नाहीं. प्रस्तुत, त्या मनुष्याला असत्कर्मानें दुःख होतें. तेव्हां त्याला पश्चात्ताप होऊन त्या असत्संगतीचा त्याग करण्याविषयीं परमेश्वरच प्रेरणा करतो. तेव्हां त्याला सुख होतें. हा ईश्वराचा अनुग्रह मानिला पाहिजे. आतां सर्व प्राणि सारिखे सुखी करावे. असें कोणी ह्मणतोल. तर ही गोष्ट संभवत नाहीं. कारण, असें झाल्यानें स्वामिभृत्यसंबंधाचा उच्छेद होईल. तो झाल्यानें, महत्त्वप्रयुक्त सुख कोणासही होणार नाहीं. न होवो तें महत्त्वप्रयुक्त सुख. आत्म्याला आनंद असला ह्मणजे झालें. असें कोणी

ह्मणेल तर फारच उत्तम आहे. कारण जो असें समजेल. त्यानें हा प्रपंच मि
थ्यावत् समजून सद्गुरूची उपसत्ती. अकृत्रिम अशी करावी. ह्मणजे त्याला आ
त्मानंद प्राप्त होईल. जे असें करितात. त्यांना आत्मानंद ईश्वरानुग्रहेंकरून प्राप्त
होतो, असें बहुत दृष्ट आहे. आतां आत्मानंदप्राप्तिकरितां गुरूपसत्ती श्रवण म
ननादिक क्लिष्ट उपायांचा कां ईश्वरानें उपदेश केला, सुकर उपायांचा कां नाहीं
केला. हाही आक्षेप ईश्वराला संभवत नाहीं, कारण, प्रारब्धकर्माच्या योगानें
जो जसा अधिकारी असेल त्याच्या योग्यतेप्रमाणें ब्रह्मादि विभूतिद्वारा त्यानें वे
दादिकांचा उपदेश केला आहे. त्यांत सन्मार्ग कोणता व दुर्मार्ग कोणता? हें सर्व
सांगितले आहेत. त्याप्रमाणें जो वागणार नाहीं त्याला स्वापराधानें दुःख प्राप्त
होईल, तर ईश्वराकडे दोष काय आहे. परास पीडा देणें वगैरे असत्कर्में
करूं नयेत, परास सुख देणें वगैरे हीं सत्कर्में अवश्य करावीं, तर सुख होतें. हें
वेदादिकांच्या उपदेशाच्या द्वारानें ज्ञान ईश्वर देतो, त्याच्या विपरीत आचरण
करणारांस जर दुःख प्राप्त झालें तर त्यांत ईश्वराकडे दोष काय आहे? जसें
शिपायाला मालकानें शत्रु मारण्याकरितां शस्त्र दिलें असून त्या शस्त्रानें तो शिपाई
आपलाच हात कापील तर त्याचा दोष मालकाकडे काय आहे. आतां सर्वांतर्यामी
जो परमात्मा त्यानें असत्संगती करण्याची कोणाला बुद्धि देऊं नये, व सर्वशक्ति
मान् असल्याकारणानें दुःखजनक वस्तु त्यानें उत्पन्न करूं नये; हेंही ह्मणणें योग्य
नाहीं, कारण असत्संगती कोणाला झाली तरी ती क्षणिक भ्रमानें होते. जे प्रौ
दीर्घविचारानें चालतात, त्यांस असत्संगती प्रायः होतच नाहीं. कदाचित् झाली
तरी पश्चात्ताप होऊन तिचा त्याग केला जातो, ही प्रौढ विचारशक्ति तो सर्वांत
र्यामी आहे ह्मणून देतो. सर्वथा जीवांचा अनुग्रहकर्ता ईश्वर आहे, दुःख देणा
नाहीं, जे त्याच्या शास्त्ररूप आज्ञेचा अनादर व भंग करितील त्यांस स्वापराधानें
दुःख होईल; ईश्वराकडे कांहीं नाहीं. आतां त्रिगुणात्मक माया ही अनादि अ
सल्याकारणानें रजोगुणाचा परिणामरूप जें दुःख तेंही अनादिजन्मपरंपरेपासून
चालत आलें आहे, अपूर्व उत्पत्ति त्याची होत नाहीं. त्याला निवृत्त करण्याची
विचारशक्ति ईश्वर देतो, जरी दुःख अनादि आहे, तथापि सद्गुरूची उपसत्ति[1] व
शास्त्रांचा अभ्यास करून आत्मानात्मविवेक केला असतां क्रमेंकरून आत्यंतिक
दुःखनिवृत्ति होते, याचा अनुभव बहुत सत्पुरुषांनीं घेतला आहे; व अद्यापि घेत
आहेत. तस्मात् परमेश्वर हा ज्ञान व अत्यंत सुख देणारा आहे, असेंच मानलें
पाहिजे. हें केवल वेदामध्यें व स्मृतिपुराणांमध्यें सांगितलें इतकेंच नाहीं, तर आ
लिकडचे ज्ञानेश्वर तुकारामबुवा वगैरे महासाधु झाले त्यांणीं हेंच सार वारंवार
सांगितलें. त्यांच्या ग्रंथाचाही आधुनिक लोकांस अभ्यास फारच आहे, ह्मणून
आतां तर ईश्वराच्या सद्भावाविषयीं व त्याच्या वैषम्यनैर्घृण्याविषयीं कोणी शंका

१ सद्गुरूला शरण जाणें.



घेऊं नये. कदाचित् घेतली तरी स्वतः होईल तितका विचार करण्याचा अभ्यास
करून तिचा परिहार करावा. दुसऱ्याशीं ईर्षेनें कलह करून व्यर्थ कालक्षेप करूं
नये. तर काय करावें? आपले कुलांत वडील जसें ईश्वर भक्ती वगैरे अनादिकाला-
पासून करीत आले त्याप्रमाणेंच करावें. आतां ईश्वरस्वरूपांत ही अनेक मतें
आहेत. कोणी असें ह्मणतात कीं, सगुणच परमात्मा आहे, निर्गुण नाहीं. निर्गुणत्व
…क वाक्यें हीं तुच्छगुणशून्यत्वाचें बोधन करितात. जीव हे त्या परमेश्वराहून
…न आहेत. ते उपासक आहेत, ईश्वर उपास्य आहे. जीवांचा मुक्तिदशेंतही
…द रहातो, अभेदप्रतिपादक श्रुती ज्या आहेत त्या जसा ईश्वर नित्य शुद्ध बुद्ध
चेतनस्वभाव आहे, तसाच मुक्तिदशेंत जीव होतो. अशा सादृश्य ज्ञानानें ईश्व-
राची उपासना करण्याकरितां व जीवाचें मुक्तिदशेंतील स्वरूप कसें तें निरूपण
करण्याकरितां आहेत. असें मानलें पाहिजे. नाहीं तर साधारण कोणी किंचित् व-
यानें अधिक असतो त्याला लहानानें अरे ह्मटलें तरी त्याचा किती अनादर होतो
हें प्रसिद्ध आहे. मग परमेश्वराचें निकृष्ट जीवाशीं तादात्म्य मानून निकृष्ट जी-
वाशीं बरोबरी करणें ह्यांत परमेश्वराचा बहुत अनादर होतो, ह्मणून अद्वैतसिद्धांत
बरोबर नाहीं, आणि कोणी जीव सुखी व कोणी दुःखी असे भिन्न भिन्न दिसतात.
ईश्वर तर सुखदुःखरहित असा श्रुत आहे. हा यांचा भेद प्रत्यक्ष सिद्ध आहे.
तस्मात् भेद हा व्यावहारिक असून पारमार्थिकही आहे. अभेद हा औपचारिक
ह्मणजे आरोपित आहे, असें श्रीमन्मध्वाचार्यसंप्रदायानुयायी ह्मणतात. ईश्वरचै-
तन्य हें सर्वव्यापी एकच आहे. त्याचे अग्निकणासारिखे अंशभूत जीव व बाकी
सर्व जडात्मक हें जगत त्याचें विशेषणीभूत धर्मरूप आहे, धर्मी परमात्मा एकच
आहे, असें त्याचें वास्तव स्वरूप आहे. तशा स्वरूपाची उपासना केली असतां
त्याशीं तादात्म्यरूप मुक्ति प्राप्त होत्ये. असें विशिष्टाद्वैतवादी श्रीरामानुजसंप्रदा-
यानुयायी ह्मणतात. आणि जीवचैतन्यें ईश्वरचैतन्याहून भिन्न असूनही सर्व-
व्यापी असलीं तरी आकाश कालादिकासारखीं अमूर्त असल्याकारणानें त्यांचें
सर्वांचें मुक्तिदशेंत, अविभागलक्षणतादात्म्य ईश्वरचैतन्याशीं प्राप्त होतें असें
विज्ञान भिक्षुप्रभृति वेदांति धुरंधरांनीं लिहिलें आहे किंचिज्ज्ञत्व व सर्वज्ञत्व या
उपाधिमात्रानें कल्पित केलेला भेद आहे, वस्तुतः सर्व हें अखंडैकरस चैतन्य
एकच आहे. असा श्रीमद् शंकराचार्यादिकांचा सिद्धांत आहे. तेव्हां ईश्वर मा-
निला तरी हीं अनेक मतें आहेत, यांतही कोणतें खरें मानावें असा व्यामोह उ-
त्पन्न होतो. असे जे शंका करितात त्यांस हें विचारिलें पाहिजे, ही शंका आ-
पले वडिलांस व त्यांचे वडिलांस प्रायः पूर्वीं कधीं येत नव्हती ती आपणास कां
येत्ये? आपण ह्मणाल कीं प्राचीन काळचे जुनाट लोक मूर्ख होते व त्यांस अनेक
भाषांचे अभ्यास नव्हते व अनेक देशांची माहिती नव्हती ह्मणून त्यांस ही शंका
येत नव्हती आह्मीं मोठे योग्य विद्वान् झालों ह्मणून अशा शंका करितां येतात असें

ह्मणतील तर त्यांच्या शंकेचें समाधान त्यांणींच करून घेतलें पाहिजे. दुसरा कोणी ब्रह्मदेवही समर्थ होणार नाहीं, कारण तो ही जुनाटच आहे. ह्मणूनच ज्या कविश्रेष्ठांचें कालिदासांचे महत्वाचें वर्णन पूर्वींचे व्याख्यानांत रावसाहेब बापट यांणीं केलें त्या कालिदासांनीं नाटकामध्यें 'वेदाभ्यासजडः' असें ब्रह्मदेवाला विशेषण दिलें आहे, तेव्हां त्यापासून काय समाधान होणार आहे. आतां स्वायंभू मनु, वसिष्ठ, व्यास वगैरे हीं त्यांचींच मुलें तीं ही जुनाट जाहालेलीं आहेत, तीं काय करणार आहेत, ह्मणून अशा मोठ्या शंकेचें समाधान शंककांनींच आपले विद्वत्तेच्या बलानें करावें दुसऱ्याचें सामर्थ्य नाहीं. आह्मीं तर जुनाट ग्रंथ थोडेसे वाचलेले, आमच्यानें या शंकेचें समाधान कोठून होईल. परंतु अध्यक्षांची आज्ञा अशी जाहाली कीं, जितकी माहिती असेल तितकी द्यावी ह्मणून मी व्यवहारानभिज्ञ असलों तरी किंचित् शास्त्राध्ययन केलें आहे. व उत्तर हिंदुस्थानांतील व अन्य ठिकाणचेही लोक प्राचीन कालांत वर्तन करीत होतें तें कांहीं पाहिलें आहे त्याप्रमाणें यथामति निरूपण करितों. ईश्वरस्वरूपाचीं निरूपक अनेक मतें असलीं तरी व्यामोहांत पडण्याचें कारण नाहीं. कां तर सर्वांतर्यामी परमात्मा उपास्य आहे. याविषयीं सर्व आस्तिक दर्शनांचें ऐकमत्य आहे. आतां, ईश्वरप्राप्तीचे साधनीभूत मार्ग अनेक असले तरी त्रयीसांख्यं० आकाशात्पतितंतोयं इत्यादि प्रमाणांवरून मुक्तोपसृप्यस्थान सर्वांच्या मतांत एकच आहे, ह्मणून त्या प्रमेयांत कांहीं विरोध नाहीं, म्हणून साधनें विरुद्ध भासलीं तरी व्यामोह होऊं शकत नाहीं. कारण, प्रारब्धकर्मवशेंकरून जे ज्या कुलांत उत्पन्न होतात, त्या कुलपरंपरेंत शिष्टांनीं आपले पूर्वजांनीं परिगृहीत केलेला व चालत आलेला जो धर्ममार्ग त्याच मार्गाला अनुसरून वागावें. प्राचीन लोक असेंच करित आले ह्मणून त्यांस अशा शंका येत नव्हत्या. असो; प्रकृतविचार इतकाच कर्तव्य आहे कीं, ईश्वराचें व परलोकाचें भय मानिल्यावांचून निर्दोष लोकव्यवहार सिद्ध होत नाहीं. याचीं कारणें सांगितलीं तर ईश्वराचें कांहीं स्वरूप समजल्यावांचून उपासना व भक्ति करितां येणार नाहीं. तें समजेल कसें तर, आपले वडील रामायण, भागवत वगैरे ग्रंथांवरून जसें ईश्वराचें स्वरूप समजून भक्तिपूर्वक लोकवर्तन करीत आले, तसेंच समजून ईश्वरोपासनापूर्वक सर्व लोकव्यवहार करावे, ह्मणजे ते व्यवहार निर्विघ्न सिद्धीला प्राप्त होतील. जसें मोठे मोठे ग्रंथकार ग्रंथाची निर्विघ्न सिद्धी होण्याकरितां ग्रंथाच्या आरंभीं ईश्वरादिकांचीं नमस्कारादिलक्षण मंगलें करीत आले, हें प्रसिद्ध आहे. लोकांतही कोणी एखादा हातांत स्मरणी धारण करून ईश्वरभजन करीत व्यवहार करितो, मग अंतःकरण त्याचें कसेंही असो; तथापि त्याशीं लोक भयानें निष्कपट व्यवहार करितात, हें अनुभवसिद्ध आहे. जे ईश्वराचें भय ठेवीत नाहींत, अथवा ईश्वर नाहींच असें ह्मणतात त्यांचें वजन किती मानितात हेंही प्रसिद्ध आहे. याकरितां 'येनास्य पितरो याता येन याताः पितामहाः ।। तेन यात्सतां मार्गं तेन गच्छन्न दुष्यति ।।' इत्यादि प्रमाणांवरून स्वकुलपरंपरेंतील सत्पुरुषांनीं



जसा ईश्वराराधनादिक धर्म परिगृहीत केला असेल त्याला न सोडतां यथाशक्ति साधुलोकांचे उपकारक व्यवहार करावे. आतां कोणी ह्मणतील कीं, पूर्वींसारिखे स्वधर्म रक्षण करूं लागलों तर चालणार नाहीं. विघ्नें फार येतात त्याला काय करावें, त्याकरितां देश व काल यांचें अनुसरण करूनच वागलें पाहिजे, तर तें ह्मणणें खरें असेल परंतु त्यांतही विचारवानांनीं असें समजलें पाहिजे कीं, देश व काल हे जड अचेतन आहेत, मनुष्य चेतन आहेत ते अचेतनाचा आकार आपले बुद्धीनें हवा तसा करूं शकतील. जसा मृत्तिकेचा घटादिक आकार कुलाल हे आपले इच्छेप्रमाणें करितात, मृत्तिकेच्या मर्जीप्रमाणें वागत नाहींत. चेतनाधीन अचेतन असतें, अचेतनाधीन चेतन नसतें. याकरितां सर्व आर्यजनांनीं बहुत प्रयत्नांनीं समुदायशक्ति मिळवून ऐक्यमतानें चांगल्या ज्या ज्या प्राचीन लोकांच्या गोष्टी असतील त्या न सोडतां ज्या नव्या चांगल्या गोष्टी असतील त्यांचें ग्रहण करावें. अचेतनवस्तु सदोष असेल तर चेतनांनीं त्या दोषाची निवृत्ति केली पाहिजे. जसें वर्णाश्रमधर्म हे व्यवहाराला प्रतिबंध करितात, ह्मणून सोडावे असें बहुत विद्वान् लोकांचें ह्मणणें आहे तें बरोबर आहे किंवा नाहीं याचा विचार असा केला पाहिजे कीं, उच्छिन्न ग्रन्थ सर्व हे प्रकट व्हावे अशी सर्व विद्वान् इच्छा मात्र करितात, परंतु ते ग्रंथ प्रसिद्ध करून त्यांत काय लिहिलें आहे त्याचें अनुष्ठान व अनुभव करण्याची व त्यांचा खरा अर्थ समजण्याची कोणी इच्छा करीत नाहींत. व्यापारमात्रांत पर्यवसान होतें तर असें न होतां पूर्वींचे लोक अध्ययन करीत होते त्याप्रमाणें जाहलें पाहिजे. त्याची सामग्री झाली पाहिजे, आणि ह्या ब्रह्मविद्येमध्यें जे विधिनिषेध आहेत ते खरे समजले पाहिजेत, त्यांजवर विश्वास ठेविला पाहिजे. एक अर्थवाद भागमात्रांत जरी आपाततः मिथ्यात्व भासतें तरी त्यांचें तात्पर्य विधीच्या प्राशस्त्यबोधनांत असतें स्वार्थामध्यें नसतें. जसा मुलगा रोगनिवृत्ती करितां औषध कडू लागतें ह्मणून घेत नसला तर त्याला खडीसाखर दाखविली ह्मणजे तो औषध घेतो. देणाऱ्याचें तात्पर्य औषध घेण्यांत असतें खडीसाखरेच्या गोडपणांत नसतें अशीं अर्थवाद वाक्यें आहेत. अशा निश्चयानें जे अध्ययनादिक करित आले, ते ब्रह्मविद्येचे पारंगतही जाहले. शंकक लोक असें ह्मणतील कीं, आतां दुसऱ्या भाषेच्या विद्यांचा अभ्यास फार करावा लागतो, त्यावांचून व्यवहार चालत नाहीं त्यामुळें वेळ मिळत नाहीं, त्याला काय करावें. तर याचें उत्तर असें कीं, स्वधर्म खरा आहे, असें जे समजतात त्यांणीं ज्या ब्राह्मणाच्या कुलांत वेदाध्ययनादिक धर्म अविच्छिन्न चालत आले आहेत, त्यांस उपद्रव देऊन त्यांचा उपहास करूं नये. ते प्रायः स्वधर्मरक्षणमात्राची इच्छा करितात. बहुत संपत्ती मिळविण्याची इच्छा करीत नाहींत. ज्यांच्या कुलांत बहुत पिढ्यांपासून वेदाध्ययनादिक व्यवहार सुटला आहे,

व त्यांची ब्रह्मविद्येची वासना जाऊन केवळ व्यवहारपांडित्य दाखऊन केवळ आहार मैथुन व निद्रा यांतच ज्यांच्या आयुष्याचें पर्यवसान होतें त्यांच्या दूरदृष्टीमुळे त्यांस आतां कांहीं उपाय राहिला नाहीं. कारण ॥ यस्य वेदश्च वेदीच विच्छिद्येते त्रिपूरुषं ॥ दुर्ब्राह्मणः स विज्ञेयः सर्वधर्मबहिष्कृतः ॥ इत्यादि स्मृतीवरून का सिद्ध होतें याचा विचार करावा. जसें वैश्य हे त्रैवर्णिकांत आहेत, तथापि बहुत कालापासून उपनयनादि संस्कार त्यांच्यांत लुप्त जाहले तसेच ब्राह्मण लोकांत वेदाध्ययनादिक व्यवहार सुटले तथापि वैश्य लोक जे ते त्यांचे आचार्यांनीं जितके धर्म लाऊन दिले तितके तरी परलोकभयानें सोडीत नाहींत कांहीं तरो भक्तिपूर्वक करितात तसें ब्राह्मणाला आतां अर्थित्व, सामर्थ्य व विद्वत्ता इत्यादिक हीं जोतिष्टोमादि कर्मांचीं साधनें नसलीं तरी पंचमहायज्ञादिक स्मार्त नित्यकर्म हें इतकें तरी श्रद्धापूर्वक करण्यांत कांहीं विशेष द्रव्यव्यय व कालव्यय नाहीं होत तरी इतकेंही जे ब्राह्मण करीत नाहींत, त्यांचा वैश्य, शूद्र वगैरे फार उपहास करितात, तरी त्यांना कांहीं वाटत नाहीं. कारण, छापिलेलीं पुस्तकें सर्व लोक वाचतात, त्यांत ब्राह्मणांचे धर्म काय आहेत ते समजतात. ते धर्म ब्राह्मणांनीं केले नाहीं ह्मणजे इतर लोक ब्राह्मणास तुच्छ मानितात, याचा विचार अभिमानानें आम्हीं ब्राह्मण आहों असें जे ह्मणतात त्यांनीं केला पाहिजे. त्यांस आमची इतकी प्रार्थना आहे कीं, आतां वेदशास्त्रादिकांचा अभ्यास किंचित् करणारे त्यांचे ज्ञातिकुलानुसार जे सदाचार चालत आले असतील त्यांत कोणी कोणाला प्रतिबंध व उपहास करूं नये, ह्मणजे सदाचारसंबंधानेंच संस्कृत ग्रन्थ जे झाले आहेत त्यांची वृद्धि होईल. व संस्कृत विद्येचा उत्कर्ष होईल. त्यायोगानें सर्वांस पारमार्थिक ज्ञान व आनंद हे प्राप्त होतील. आणि असें कोणी ह्मणतील कीं, अनेक विरुद्ध धर्माचार चालल्यानें कलहवृद्धि होईल. तर असें नाहीं; कारण, सांप्रतकालीं ज्या ज्या देशांत सदाचाराचा लोप फार झाला आहे तेथेंच कलह फार चालतो. जेथें सदाचार प्राक्तन चालत आला आहे त्याचा विच्छेद नाहीं तेथें कलह होत नाहीं असेंच बहुत लोकांच्या अनुभवास येतें. आतां सर्व विद्येची वृद्धि झाली तर विद्याभिमानप्रयुक्त मत्सर होऊन कलहवृद्धि फार होईल असें कोणी ह्मणतील तर जे धनप्रतिष्ठादि लोभेंकरून विद्या करितील त्यांच्या दूरदृष्टीनें परस्पर कलह जाहला तर होवो, त्याचीं फळें तशींच ते भोगतील; परंतु जे मनुष्य देहाच्या सार्थक्याकरितां विद्या करतील त्यांचा पूर्वींचा अविद्याकृत कलहबुद्धीचा विद्येनें नाश होऊन ते कृतार्थ होतील. आतां लोक त्यांस फार उपद्रव देऊं लागले तर त्यांणीं काय करावें ? प्रपंच सोडून वनांत जावें तर प्रपंचाचा नाश होतो, तेंही पातकच आहे. ह्याकरितां प्रपंचांत राहून जगन्मित्रत्व संपादक लोकवर्तन कसें करावें तें शास्त्रकारांनीं लिहिलें आहे, त्याप्रमाणें वागावें, तें असें— आपापल्या प्रारब्ध कर्मांच्या योगानें जगांत चार प्रकारचे मनुष्य होतात, सुखी,



दुःखी, पुण्यवान् व पापी. आतां जो सुखी तो पुण्यवान् व दुःखी तो पापी असा नियम मानितां येत नाहीं. कारण या जन्मांत जरी कोणी पुण्य करीत आला असला तरी जन्मांतरच्या प्रारब्धकर्मांच्या योगानें दुःख भोगतो तसेंच पापी असला तरी सुख भोगतो असा व्यभिचार बहुत दृष्ट होतो. याकरितां चार प्रकारचे भेद दाखविले आहेत त्यांत सुखी जनाशीं सर्वदा मैत्री ठेवावी. ती ठेवल्यानें कोणी सुखी जन आपल्याशीं ईर्ष्या करून कांहीं दुःख देणार नाहीं, त्याणें आपल्याही चित्तापासून हें ईर्ष्याकालुष्य निवृत्त होईल. दुःखी प्राण्यांच्याठायीं सर्वदां दया ठेवावी, म्हणजे आपल्यासारिखें दुसऱ्याला दुःख कधीं न व्हावें अशी जो इच्छा करितो त्याच्या चित्तापासून परोपकाराची इच्छा करणें वगैरे हें कालुष्यनिवृत्त होतें. पुण्यशील प्राण्यांना पाहून जो सर्वदां आनंद मानील त्याच्या अंतःकरणापासून असूयारूपी मल दूर होतो. अपुण्यशील प्राण्यांच्याठायीं सर्वदां उपेक्षा म्हणजे उदासीनताच ठेवावी. त्यानें चित्तापासून क्रोधरूपी मल दूर होतो अशा रीतीनें व्यवहारांत वागलें तर कोणापासूनही उपद्रव होण्याचा संभव नाहीं, हे चार प्रकारचे प्राण्यांचे भेद व त्यांशीं वर्तनांचे भेद पातंजलयोगसूत्रांत व श्रीमद्भागवतादिक महाप्रामाणिक ग्रंथांत सांगितले आहेत. अशाच प्रकारचे भगवद्गीतेंतही चार भेद सांगितले आहेत. ते ( आर्तो जिज्ञासुरर्थार्थी ज्ञानीच भरतर्षभ ) आर्त, जिज्ञासु, अर्थार्थी, व ज्ञानी असे. त्यांत पूर्वोक्त सुखी जनाचा व गीतेंतील जिज्ञासूचा स्वभाव एक मिळतो. जसा कोणी एकादा संपन्न व विद्वान् असून त्यानें सत्संगति सुखानें केली तर त्याला नित्य नव्या नव्या पदार्थांच्या ज्ञानाची इच्छा होते, ह्मणून तो जिज्ञासु व सुखी हे एकच. आर्त आणि दुःखी हे दोघे शब्दार्थावरून एकच आहेत हें प्रसिद्ध आहे. आतां जे दुसऱ्याच्या सुखदुःखाचा विचार न करितां स्वार्थसंपादनांतच केवळ तत्पर असतात, ते पापी असें शास्त्रकारांनीं लिहिलें आहे, ते आणिक गीतेंतील अर्थार्थी एकच होतात. पुण्यवान् भगवत्प्रिय आहेत हें प्रसिद्ध आहेच, आणि गीतेंत भगवंतानीं असें सांगितलें आहे कीं, ( ज्ञानी त्वात्मैव मे मतं ) ज्ञानी जो तो मला अति प्रिय आहे, आत्म्यासारिखा व तो माझा आत्मा आहे. यावरून पुण्यवान् व ज्ञानी हे दोन्ही एकच असें सिद्ध होतें. याजवर असें कोणी म्हणेल कीं, अशा साधुवृत्तीनें वागलें तर मठांतच जाऊन राहण्याचा बाल्यावस्थेपासूनच प्रसंग येईल. तो आला असतां द्रव्यादि संपादन करून परोपकार करणें वगैरे हे पुरुषार्थ कांहीं सिद्ध होणार नाहींत, ते नाहीं झाले तर पुनरपि मनुष्यदेहाचें सार्थक्य होणार नाहीं. ही शंका तदवस्थच राहील तर असें म्हणूं नये. कारण बुद्धिमान् लोकांनीं लोकांमध्यें राहूनच मैत्र्यादि भावना करीत सर्व योग्य व्यवहार करून सर्व पुरुषार्थ संपादन केले तरी होऊं शकतील. त्यांसच सर्वांपेक्षां बुद्धिपराक्रमानें श्रेष्ठत्व प्राप्त होईल. व अंतकालीं ब्रह्मसाक्षात्कार प्राप्त होईल. या सर्व अभिप्रायानें स्वा-

यंभूमनुप्रभृति महर्षींनीं असें सांगितलें कीं या सृष्टींत प्रथम पंचमहाभूतें उत्पन्न झालीं, त्यांत कांहीं स्थावर व जंगम असे दोन भेद उत्पन्न झाले, त्यांत वृक्ष पर्वतादिक हे स्थावर, क्रिमिकीटपंतंगादिक हे जंगम. यांना भूत असें म्हणतात त्यांमध्यें महीलता पर्वत इत्यादिकांपेक्षां जंगम जे कीटादि प्राणी आहेत ते श्रेष्ठ आहेत. कारण ते आहारविहारादि चेष्टा करण्यास स्वतः समर्थ असतात त्या योगानें कांहीं तरी सुखानुभव करितात. त्यांच्यापेक्षां जे प्राणी आपल्या बुद्धीनें जीवन करितात म्हणजे हित काय अहित काय यांचा कांहीं विवेक करितात. कुत्रे कोल्हे वगैरे हे प्राणी. कशावरून? तर ते उष्णानें संतप्त झाले म्हणजे छाये खालीं जातात शीतानें पीडित झाले म्हणजे उष्णामध्यें जातात. जेथें आहार मिळत नाहीं त्या स्थानाचा त्याग करितात असे असतात त्यांच्यापेक्षां मनुष्य श्रेष्ठ आहेत. कारण ते व्याघ्रादिक भयंकर प्राण्यांसही युक्तीनें आपल्या ताब्यांत आणून वागवितात. मनुष्यामध्यें ब्राह्मण श्रेष्ठ आहेत, असें शास्त्रकारांनीं लिहिलें आहे खरें परंतु ज्या शास्त्रकारांनीं लिहिलें आहे ते ब्राह्मण होते, म्हणून आपल्या जातीचाच उत्कर्ष व्हावा या आशयानें लिहिलें आहे किंवा खरें आहे, याचा विचार केला पाहिजे. तो असा—पूर्वकालांतील वसिष्ठ, अगस्त्य, वामदेव, वेदव्यासप्रभृति कसे होते तें इतिहासपुराणांवरून सर्वांस माहितच आहे. आतांही महापंडित म्याक्समुलुरप्रभृति आहेत ते भट्ट वगैरे अशा ब्राह्मणांच्या पदव्या मिळवून इंद्रपदाचे इच्छेसारिखें आम्हांस सर्व लोकांनीं ब्राह्मण म्हणावें अशी इच्छा करितात. आणि जर ब्राह्मणांनीं आपल्या महत्त्वाकरितांच ब्राह्मण श्रेष्ठ आहेत असें लिहिलें असतें तर बाकीचे सर्व वर्ण आजपर्यंत ब्राह्मणांस न मानिते. कारण मत्सर हा स्वाभाविक धर्म आहेच तो सर्वांचा तुल्यच आहे त्यानें ते कधींच ब्राह्मणांस घालवून देते. आतां तर ब्राह्मण वेदाध्ययनापासून ते जोडे विकण्यापर्यंत उद्योग असें समजून मोठे उत्साहानें धंदे करितात. त्यांतही इतर वर्णांचे जे लोक धंदे करितात त्यांपेक्षां जलद कामकरण्याच्या विषयांत व चांगलें कामकरण्याच्या विषयांत व यजमान दहा गोष्टी बोलला तरी त्या सहन करण्याच्या विषयांत व यजमानाची अन्याय्य एकादें कामरण्याच्या विषयांत मुर्वत न ठेविण्याविषयीं ब्राह्मणांच्या मुलांचें बुद्धिकौशल अधिक दिसतें. आणि हें तर उघडच दिसतें कीं, पूर्वीं ब्राह्मण जातीचेच लोक आम्हीं ब्राह्मण आहों असें म्हणत होते आतां तर अनेक जातींचे लोक आम्हीं ब्राह्मण आहों असें ह्मणतात अशा अनेक गोष्टी आहेत. परंतु काल थोडा आहे म्हणून सर्व सांगूं शकत नाहीं यावरून ब्राह्मण पदार्थच कांहीं अशा महत्वाचा आहे कीं, तो सर्व मनुष्यांस आपल्याला प्राप्त करून घेण्याची इच्छा होते पुराणांत एक कथा अशी आहे कीं, एका वैश्यानें ब्राह्मण्यप्राप्तिकरितां तपश्चर्या करून ब्रह्मदेवाला प्रसन्न केला. ब्रह्मदेवानें त्याला इंद्रपद देऊं केलें परंतु ब्राह्मण्य दिलें नाहीं. विश्वामित्र हा क्षत्रियकुलांत उत्पन्न होऊन ब्राह्मण्यप्राप्तीकरितां लक्षावधी वर्षें

सं.नि.२८



तपश्चर्या करून ब्रह्मऋषित्व प्राप्तीची इच्छा करित होता परंतु त्याला ब्रह्मऋषी असें म्हणण्याचें वसिष्ठासारिख्याचेंही धैर्य झालें नाहीं. या सर्व गोष्टींवरून खरें काय असेल त्याचा निर्णय बुद्धिमान् लोकांनीं करावा. प्रकृत असें आहे कीं मनुष्यांत ब्राह्मण श्रेष्ठ असतात ते नित्यपुष्ट, अन्नसत्रभोजी, ब्राह्मण कांहीं उपयोगाचे नाहींत, विद्वान् असले पाहिजेत कारण यागादि सत्कर्मांमध्यें त्यांना अधिकार असतो, तेही किंचित् पुस्तक पाहून विद्वान् झालेले कामाचे नाहींत तर कृतबुद्धि असले पाहिजेत म्हणजे वेदादिकांचें खरें तत्व जाणणारे. तेही आलस्यादिकेंकरून शास्त्रीय व लौकिक व्यवहाराचा उद्योग करीत नसले तरी ते उपयोगाचे नाहींत, त्यांजपेक्षां यथाशक्ति आचरणविहित शास्त्रीय व लौकिक व्यवहाराचें करितात ते श्रेष्ठ हें पूर्वोक्त सर्व करून ब्रह्मनिष्ठांच्या मार्गाला लागणें ह्यांत सर्व गोष्टीहून उत्कर्ष अधिक आहे म्हणूनच धर्मोपदेशाला तीन वेदांचे अर्थ जाणणारे ब्राह्मण सभ्य असावे किंवा ब्रह्मनिष्ठ एक असला तरी तो धर्माचा उपदेश करूं शकतो असें याज्ञवल्क्यानें लिहिलें आहे; तेव्हां सांप्रतकालांत असें शास्त्रकारांनीं लिहिल्याप्रमाणें वागण्याची सामग्री नाहीं तरी होईल तितकें आलस्य न करितां सर्व व्यवहार केले तर कां बाल्यअवस्थेपासून मठांत जाऊन राहाण्याचा प्रसंग येईल. पाहा महा पंडित डाक्टर म्याक्सम्युलरप्रभृति यांनीं वेदादिकांच्या माहितीचा बहुत वर्षें उद्योग केला. ह्मणून त्यांस जगद्गुरु असेंही बहुत लोक ह्मणतात. याकरितां वेदादिकांमध्यें सांगितलेले जितके धर्म आहेत त्यांचें सर्वांचें आचरण करणें हें जरी अशक्य असलें तरी गौणपक्षाचें आश्रयण करून लोकवर्तन करावें सर्वथा शास्त्रमार्ग सोडूं नये. शास्त्रावर विश्वास जे शास्त्रज्ञ आहेत त्यांजपेक्षां अशास्त्रज्ञ आहेत त्यांचा फार असतो. अशास्त्रज्ञ जगामध्यें फारच आहेत. त्यांचा शास्त्रांवर विश्वास अधिक असण्यास कारण हेंच कीं, त्यांना स्वतः वाक्यार्थ विचारकरून शास्त्राचा विचार करण्याची शक्ती नसली तरी पूर्वींचे शास्त्रज्ञ लोक कसे शास्त्राप्रमाणें वागत होते. त्यांची स्मरणशक्ति त्यांस बलवत्तर असते तिच्या योगानें आमच्या सारख्या आधुनिकानें एकादा शास्त्रार्थ सांगितला तरी त्याच्यावर त्यांचा विश्वास बसत नाहीं. ते असें ह्मणतात कीं पन्नास वर्षांपासून आह्मीं पाहात आलों आमच्या श्रीमंताच्या येथें जगन्नाथशास्त्रीबोवा होते. ते निराळा शास्त्रार्थ सांगत होते आणि आतांचे हे थोडे शास्त्र पढलेले तितके वेगळेच शास्त्रार्थ सांगतात. तेव्हां जे पूर्वीं शास्त्रार्थ सांगत होते; त्याप्रमाणें आम्ही करूं असें बहुत म्हणतात. याजवरून अशास्त्रज्ञ लोकांचा शास्त्रावर विश्वास शास्त्रज्ञांपेक्षां अधिक असतो हें सिद्ध होतें. शास्त्रज्ञ जे आहेत ते कदाचित् स्वबुद्धिबलानें शास्त्राचा दुसरा अर्थ करून वागतील असाही संभव आहे. एतावता शास्त्र सर्वथा सुटत नाहीं. कांहीं तरी सर्वांस शास्त्राची गरज आहे. परलोक भय सर्वांस आहे. तें दूर होण्याला साधन सांगणारें शास्त्र जितकें समर्थ आहे तितकें दुसरें कोणतेंही वस्तु नाहीं, तीं

शास्त्रें जीं कांहीं ब्राह्मणकुलाचे रक्षणानें जितकीं वृद्धीला पावतील तितकीं दुसरे उपायानें पावणार नाहींत. म्हणून पूर्वीपासून जितके महापुरुषार्थ संपादन करणारे मोठमोठे राजे जाहाले त्यांच्या विरुदावलीमध्यें शिष्ट लोक गोब्राह्मण-प्रतिपालक असें विशेषण देत आले. बरें असो मनुष्यामध्यें ब्राह्मणांच्या रक्षणाची कांहीं जरूर आहे. (पूर्वी गोष्टी सांगितल्या त्यावरून.) परंतु गोब्राह्मण-प्रतिपालक हें जें श्रीमंत लोकांस विशेषण देतात त्यामध्यें गो शब्दाचें ग्रहण पूर्वी पालनीयत्वानें केलें आहे याचें कारण काय? गाई जात्या इतर पशूंसारिख्या आहेत. जे उपयोग त्यांच्यापासून करून घेण्याला योग्य होतील त्या उपयोगांला लावाव्या. त्यांचा जो उपयोग करून घेतल्यापासून मनुष्यांस फायदा अधिक होत असेल तो सर्व मनुष्यानें करून घ्यावा तो कां सोडावा. तर हो महाराज आपण म्हणतां केवल मनुष्यानेंच त्यांचा उपयोग करून घ्यावा. शास्त्रदृष्टीनें पाहिलें तर सर्व ब्रह्मांडांतल्या देव पितर गंधर्व मनुष्य वगैरे यांचें रक्षण गाईचें रक्षणापासून होतें. श्रौतस्मार्त कर्मामध्यें इंद्रादि देवतांना भाग दिले जातात. त्या भागामध्यें गाईचें दुग्ध दधि घृत वगैरे हीं मुख्य होमद्रव्यें श्रुतिस्मृतींतून सांगितली आहेत. शरीराच्या शुद्धीकरितां महिनाभर गाईचें दुग्ध प्राशन करून राहावें. अशीं प्रायश्चित्तें सांगितलीं आहेत. यज्ञयागादिकांमध्यें सर्व प्रकारच्या दक्षिणेंत गाई ह्या मुख्य दक्षिणा सांगितल्या आहेत. सर्व दानांमध्यें गोप्रदान हें मुख्य सांगितलें आहे. एक गाईचे पूजेनें चतुर्दशभुवनांची पूजा केल्याचें फल प्राप्त होतें. असें शास्त्रकारांनीं सांगितलें. तेव्हां शास्त्रदृष्टीनें पाहिलें तर सर्व ब्रह्मांडांतल्या देव, पितर, गंधर्व व मनुष्य वगैरे ह्या सर्वांचा उपयोग गाईपासून होईल तसा करावा. तो सर्व उपयोग सुज्ञ गृहस्थांच्या घरोघर स्वाहाकार व स्वधाकार नेहेमी चालत असले तरच होणार आहे. स्वाहास्वधाकारनिरंतराणि वैकुंठतुल्यानि गृहाणि तानि ॥ स्वाहास्वधाकारविवर्जितानि श्मशानतुल्यानि गृहाणि तानि ॥ १ ॥ इत्यादि शास्त्रांवरून देवादिकांची तृप्ति शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें गाईचें दुग्ध, दधि, घृत यांच्या पासून होणारी आहे. हें पूर्वी सुचविलें आहे. आणि शास्त्रामध्यें असें लिहिलें आहे. कीं ज्या ठिकाणीं होमाला द्रव्य सांगितलें नाहीं. तेथें गोघृत घ्यावें. तें न मिळालें तर महिषीचें घ्यावें. यावरून गव्य द्रव्य देवादिकांस किती प्रिय आहे हें बुद्धिमान् लोकांनीं जाणावें. स्वर्गामध्यें अमृताची उत्पत्ति होते. ती या कर्मभूमींतल्या होम केलेल्या द्रव्यापासून होते. हें शास्त्रांत प्रसिद्ध आहे म्हणूनच महाकवि माघकृत शिशुपालवधकाव्यामध्यें अमृतं नामयत्संतोमंत्रजिव्हेषु जुव्हति ॥ शोभैवमंदरक्षुब्धक्षुभितांभोधिवर्णना ॥ १ ॥ याचा अर्थ असा कीं स्वर्गांतील खरें अमृत तेंच आहे कीं, जें ब्राह्मण लोक मंत्रजिह्व म्हणजे अग्नि त्याचे ठाईं होम करून सिद्ध करितात. मंदराचल पर्वतानें समुद्रमंथन करून त्यापासून अमृत काढिलें. इत्यादि वर्णन केलें तें केवल शोभा मात्र



आहे. आतां बहुत काय सांगावयाचें आहे. सर्व प्रजेचें रक्षण गाईपासूनच होत आहे. याला प्रमाण स्वयंभू मनूचें वाक्य असें आहे कीं ॥ अग्नौप्रास्ताहुतिः सम्यगादित्यमुपतिष्ठते ॥ आदित्याज्जायते वृष्टिर्वृष्टेरन्नं ततः प्रजाः ॥ १ ॥ याकरितांच ऐतरेयोपनिषदामध्यें परमेश्वरानें प्रजा उत्पन्न करण्याची इच्छा केली, तेव्हां त्या प्रजेच्या रक्षणाकरितां गाय निर्माण केली असें सांगितलें आहे. याप्रकारचे गाईचे उपयोग शास्त्रदृष्टीनें पाहिले तर बहुत आहेत. ते सर्व थोड्यावेळांत सांगतां येणार नाहींत. व्यवहारदृष्टीनें पाहिलें तरी शरीरांची पुष्टि दुग्ध, घृत वगैरे यापासूनच होते हें प्रसिद्ध आहे. मंगलकार्यांमध्यें पक्वान्न वगैरे सर्व दुग्धघृतापासूनच उत्तम होतात. एक गाईचें रक्षण केलें असतां तिच्यापासून ज्या अनेक पाड्या होतील त्या गाई होतील त्या दुग्ध वगैरे देतील. पाडे होतील ते शेताचे उपयोगी पडतील व ओझ्याच्या उपयोगी पडतील. किंबहुना ते मेले तरी शृंगें चर्मादि मनुष्यांच्या उपयोगी पडतील असें अनेकप्रकारचे गाईपासून उपयोग होतात. त्या गाईच्या रक्षणाविषयीं स्वधर्म जाणून सर्वांनीं यत्न करावा अशी प्रार्थना आहे. आतां असें कोणी म्हणेल कीं, गोब्राह्मणप्रतिपालन करावें हें खरें आहे. परंतु आतां तशा कामधेनूसारिख्या गाई व वसिष्ठासारिखे ब्राह्मण कुठें आहेत अशी शंका करणें युक्त नाहीं. कारण कीं, येथें जरी तशा गोब्राह्मणांची उपलब्धि नाहीं तरी कुठेंच तसे आतां ब्राह्मण राहिले नाहींत. हें म्हणणें केवळ साहस आहे. आणि जे आस्तिकसंपन्न असतील त्यांना जरी तसे ब्राह्मण येथें उपलब्ध नसले तरी जे आहेत. त्यांत जे स्वधर्माला योग्य दिसतील त्यांचा स्वधर्म जसजसा वाढेल तसा वाढविण्याचा यत्न करावा. ते योग्य अधिकारी जाहाल्यावर त्यांच्यापासून स्वधर्म समजून घेऊन आपणही कृतार्थ व्हावें. जसें रामकृष्णादिकांच्या मूर्ति पूर्वी टांकी लावून घडवितात. नंतर ब्राह्मणद्वारा प्रतिष्ठाविधि करवून त्याच मूर्तीमध्यें ईश्वरभावना करून उपासक जन कृतार्थ होतात. तसें जाणावें. गोब्राह्मण आतां तसे चांगले नाहींत म्हणून त्यांच्या कुलाचाच जर नाश केला तर मूलच नष्ट जाहाल्यानंतर शाखा कुठून वाढणार आहे. आतां कोणी असें म्हणेल कीं शास्त्र जरी खरें असलें तरी शास्त्राप्रमाणें विहित कर्मे केलीं तर सर्व आयुष्य कर्मांतच जाईल. दुसरा उद्योग कांहींच होणार नाहीं. तो न जहाला तर जीवनही होणार नाहीं. तर हें म्हणणें जे अत्यंत अनुपपन्न असतील त्यांचें कांहीं बरें दिसेल ज्यांना निर्वाहाची उपपत्ती असून केवल विषयसुखभोगाकरितां हें निमित्त सांगतील त्यांचें सांगणें खोटें होईल अनुपपन्न असतील त्यांनींही शास्त्राच्या गौणपक्षाचा आश्रय करून स्वस्वकालीं अल्प तरी संध्यादिक नित्य कर्मे करून बाकीचा राहिला जो काल त्या कालामध्यें निर्वाहाकरितां न्यायानें धनार्जनाचा उद्योग केला तर होऊं शकेल. सर्वथा आळशी असतील त्यांस मात्र होणार नाहीं. जे उद्योगी असतील त्यांनीं प्रातःकालीं अमुक कर्तव्य तदनंतर अमुक कर्तव्य

तितर्क

अशा नियतकालाचा विभाग करून नित्यकर्म व व्यवहार हीं दोन्हींदन[illegible]
केलीं तर होण्यासारिखीं आहेत. तो कालाचा विभाग कसा करावा हें [illegible]
सिंधूमध्यें तृतीयपरिच्छेदांत गृहस्थधर्म लिहिले आहेत त्याप्रकरणीं सांगित[illegible]
आहे. आतां कोणी असें म्हणतील कीं ब्राह्मणाचें धर्मरक्षण करणें आमचे प्रा[illegible]
रब्धीं नसलें तर आम्हीं काय करावें, तर त्याविषयीं कांहीं करावें असें आ[illegible]
म्हणत नाहीं. तर जे ब्राह्मणधर्मानें वागण्याची इच्छा करितात. त्यांस उपद्रव दे[illegible]
नये हें आम्हीं म्हणतों. जर त्यांचेपासून तुम्हांस उपद्रव होत असेल तर त्यांस ये[illegible]
देऊं नये. तेही कधीं येणार नाहींत. हा सर्व सांगितलेला विचार ध्यानांत आणू[illegible]
यांत काय गुणदोष असतील त्यांचा विवेक करून जे अशा उद्योगाला लागती[illegible]
त्यांचे सर्व पुरुषार्थ क्रमेंकरून सिद्ध होतील. जे यामध्यें आलस्य करितील [illegible]
पुनःपुनः दुःखमय पंजरांत पडतील म्हणून आजचे भाषणाचा सारांश इतकाच
आहे कीं, आपल्या शक्तीप्रमाणें शास्त्राशीं व लोकांशीं विरोध न होतां लोकवर्तन
म्हणजे लोकव्यवहार आपआपले बुद्धीनें व आपआपले अधिकाराप्रमाणें परस्पर
उत्कर्षाची इच्छा करितील, एकमेकांच्या अपकर्षाची इच्छा करणार नाहींत. त[illegible]
कोणाशीं कधींही कलह होणार नाहीं. असें जाहाल्यानें सर्व जगतांचें कल्याण
होईल. यास्तव सर्व जगत्कल्याणाचे उद्योग लोकांनीं करीत असावें अशी बुद्धि
ईश्वरानें लोकांस देत असावी अशी मी सर्वदा ईश्वराची प्रार्थना करितों.

म. ग्रं. सं. ठाणे

विषय: निबंध

संग्रहालय क्रमांक: ५१ / ५८०

लेखक: ईश्वरस्मरणपूर्वक स्वपरसंतोषजनक लोक[illegible]न

पुस्तकाचें नांव: राजाराम[illegible]

१८[illegible]


५१
सं. क्र.

# ईश्वरस्मरणपूर्वक स्वसंतो-जनक लोकवर्तन.

निबंध

अशा नियतकालाचा विभाग करून नित्यकर्मं व व्यवहार हीं दोन्हीं व्यवस्थेनें केलीं तर होण्यासारिखीं आहेत. तो कालाचा विभाग कसा करावा हें सर्व धर्मसिंधूमध्यें तृतीयपरिच्छेदांत गृहस्थधर्म लिहिले आहेत त्याप्रकरणीं सांगितले आहे. आतां कोणी असें म्हणतील कीं ब्राह्मणाचें धर्मरक्षण करणें आमचे प्रारब्धीं नसलें तर आम्हीं काय करावें, तर त्याविषयीं कांहीं करावें असें आम्हीं म्हणत नाहीं. तर जे ब्राह्मणधर्मानें वागण्याची इच्छा करितात. त्यांस उपद्रव देऊं नये हें आम्हीं म्हणतों. जर त्यांचेपासून तुम्हांस उपद्रव होत असेल तर त्यांस येऊं देऊं नये. तेही कधीं येणार नाहींत. हा सर्व सांगितलेला विचार ध्यानांत आणून यांत काय गुणदोष असतील त्यांचा विवेक करून जे अशा उद्योगाला लागतील त्यांचे सर्व पुरुषार्थ क्रमेंकरून सिद्ध होतील. जे यामध्यें आलस्य करितील ते पुनःपुनः दुःखमय पंजरांत पडतील म्हणून आजचे भाषणाचा सारांश इतकाच आहे कीं, आपल्या शक्तीप्रमाणें शास्त्राशीं व लोकांशीं विरोध न होतां लोकवर्तन म्हणजे लोकव्यवहार आपआपले बुद्धीनें व आपआपले अधिकाराप्रमाणें परस्पर उत्कर्षाची इच्छा करितील, एकमेकांच्या अपकर्षाची इच्छा करणार नाहींत. तर कोणाशीं कधींही कलह होणार नाहीं. असें जाहाल्यानें सर्व जगताचें कल्याण होईल. यास्तव सर्व जगत्कल्याणाचे उद्योग लोकांनीं करीत असावें अशी बुद्धि ईश्वरानें लोकांस देत असावी अशी मी सर्वदा ईश्वराची प्रार्थना करितों.

अशा नियतकालाचा विभाग करून नित्यकर्मे व व्यवहार हीं दोन्हीं व्यवस्थेनें केलीं तर होण्यासारिखीं आहेत. तो कालाचा विभाग कसा करावा हें सर्व धर्मसिंधूमध्यें तृतीयपरिच्छेदांत गृहस्थधर्म लिहिले आहेत त्याप्रकरणीं सांगितलें आहे. आतां कोणी असें म्हणतील कीं ब्राह्मणाचें धर्मरक्षण करणें आमचे प्रारब्धीं नसलें तर आम्हीं काय करावें, तर त्याविषयीं कांहीं करावें असें आम्हीं म्हणत नाहीं. तर जे ब्राह्मणधर्मानें वागण्याची इच्छा करितात. त्यांस उपद्रव देऊं नये हें आम्हीं म्हणतों. जर त्यांचेपासून तुम्हांस उपद्रव होत असेल तर त्यांस येऊं देऊं नये. तेही कधीं येणार नाहींत. हा सर्व सांगितलेला विचार ध्यानांत आणून यांत काय गुणदोष असतील त्यांचा विवेक करून जे अशा उद्योगाला लागतील त्यांचे सर्व पुरुषार्थ क्रमेंकरून सिद्ध होतील. जे यामध्यें आलस्य करितील ते पुनःपुनः दुःखमय पंजरांत पडतील म्हणून आजचे भाषणाचा सारांश इतकाच आहे कीं, आपल्या शक्तीप्रमाणें शास्त्राशीं व लोकांशीं विरोध न होतां लोकवर्तन म्हणजे लोकव्यवहार आपआपले बुद्धीनें व आपआपले अधिकाराप्रमाणें परस्पर उत्कर्षाची इच्छा करितील, एकमेकांच्या अपकर्षाची इच्छा करणार नाहींत. तर कोणाशीं कधींही कलह होणार नाहीं. असें जाहाल्यानें सर्व जगताचें कल्याण होईल. यास्तव सर्व जगत्कल्याणाचे उद्योग लोकांनीं करीत असावें अशी बुद्धि ईश्वरानें लोकांस देत असावी अशी मी सर्वदा ईश्वराची प्रार्थना करितों.

---